असा. क्र. ४३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, डिसेंबर २६, २००७/पौष ५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . ३०९-३१६

दिनांक २४ डिसेंबर २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २६ डिसेंबर २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा**

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये प्रकरण चार-अ समाविष्ट करणे. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८६ नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" प्रकरण चार-अ

**विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे**

विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे. **८६ अ.** (१) महानगरपालिका, आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्याची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेला प्रकट करता येईल.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,—

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन) इंटरनेटवर ;

(तीन) महानगरपालिकेच्या मुख्यालयामधील तसेच प्रभाग कार्यालयांमधील सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने,

माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, महानगरपालिका ती माहिती प्रकट करेल.

(३) महानगरपालिकेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) महानगरपालिकेचा तपशील ;

(दोन) महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र— मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहिच्या लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र ; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) महानगरपालिका पुरवित असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल ;

(आठ) महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसाहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे प्रमुख बांधकामांचे तपशील; तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती ;

(अकरा) महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने ;

(ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यांमार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.".

## प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यांमध्ये सुधारणा

१९४९ चा मुंबई ५९. **३.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ६० नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये प्रकरण चार-अ समाविष्ट करणे.

## " प्रकरण चार-अ

## विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे

**६० अ.** (१) महानगरपालिका, आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्याची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेला प्रकट करता येईल. विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,—

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन) इंटरनेटवर ;

(तीन) महानगरपालिकेच्या मुख्यालयामधील तसेच प्रभाग कार्यालयांमधील सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने,

माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, महानगरपालिका ती माहिती प्रकट करेल.

(३) महानगरपालिकेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) महानगरपालिकेचा तपशील ;

(दोन) महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र-मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहिचा लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र ; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल ;

(आठ) महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील; तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती ;

(अकरा) महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने ;

(ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.".

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**४.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ५६ नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २ यामध्ये प्रकरण चार-अ समाविष्ट करणे.

## " प्रकरण चार-अ

## विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे

**५६ अ.** (१) महानगरपालिका, आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्यांची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेला प्रकट करता येईल. विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,—

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन) इंटरनेटवर ;

(तीन) महानगरपालिकेच्या मुख्यालयामधील तसेच प्रभाग कार्यालयांमधील सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा पद्धतीने,

माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, महानगरपालिका ती माहिती प्रकट करेल.

(३) महानगरपालिकेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) महानगरपालिकेचा तपशील ;

(दोन) महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र—मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहिचा लेखापरीक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र ; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल ;

(आठ) महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसाहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) महानगरपालिका क्षेत्राच्या विकासासाठी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे प्रमुख बांधकामांचे तपशील; तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती ;

(अकरा) महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने ;

(ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.".

प्रकरण पाच

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये सुधारणा.**

१९६५ चा महा. ४०. **५.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ८७ नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये प्रकरण सहा-अ समाविष्ट करणे.

" प्रकरण सहा-अ

**विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.**

**८७ अ.** (१) परिषद, आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्याची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती परिषदेला प्रकट करता येईल. विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,—

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन) इंटरनेटवर ;

(तीन) परिषदेच्या मुख्यालयामधील तसेच तिच्या इतर कार्यालयांमधील, कोणतीही असल्यास, सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने,

माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, नगरपरिषद ती माहिती प्रकट करेल.

(३) नगरपरिषदेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) नगरपरिषदेचे तपशील ;

(दोन) नगरपरिषदेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र-मग त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) नगरपरिषदेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहीचा लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र ; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) परिषद पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल ;

(आठ) नगरपरिषदेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) नगरपरिषद क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील; तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती ;

(अकरा) नगरपरिषद निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा परिषदेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि नगरपरिषदेला मिळालेली अनुदाने ;

(ड) नगरपरिषदेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे त्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ८५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, डिसेंबर २६, २००७/पौष ५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Second Amendment) Act, 2007 (Mah. Act No. XXXIII of 2007), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 2007.

(First published, after having received the assent of the Governor, in the "*Maharashtra Government Gazette*", on the 26th December 2007).

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS, it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-eighth Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

## PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Second Amendment) Act, 2007.

*(2)* It shall come into force on such date, as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

## CHAPTER II

## AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT

Insertion of Chapter IV-A in Bom. III of 1888.

**2.** After section 86 of the Mumbai Municipal Corporation Act, the following Chapter shall be inserted, namely :— Bom. III of 1888.

## " CHAPTER IV-A

## DISCLOSURE OF SPECIFIED INFORMATION

Disclosure of specified information.

**86A.** *(1)* The Corporation shall maintain and publish all its record duly catalogued and indexed in a manner, and form which enables the Corporation to disclose the information, specified in sub-section (3).

*(2)* The manner of disclosure of information shall include the publication of the information,—

*(i)* in News papers ;

*(ii)* on Internet ;

*(iii)* on Notice boards of the Corporation at its Head Office as well as Ward Offices ;

*(iv)* by such other mode, as may be prescribed :

Provided that, the information shall be disclosed in the language in which it is available with the Corporation.

*(3)* The Corporation shall be required to disclose the following information, namely :—

*(i)* particulars of the Corporation ;

*(ii)* a statement showing the boards, councils, committees and other bodies, by whatever name called, constituted for the purpose of exercising the functions of the Corporation or rendering advise to it, whether or not the meetings of those boards, councils, committees and other bodies are open to the public or the minutes of such meetings are accessible to the public ;

*(iii)* a directory of its officers and employees ;

*(iv)* the particulars of officers who are empowered to grant concessions, permits or authorisations for any activity of the Corporation ;

*(v)* audited financial statements showing Balance sheet, Receipts and Expenditures, and cash flow on a quarterly basis, within two months of end of each quarter, and audited financial statements for the full financial year, within three months of the end of the financial year ;

*(vi)* the statement showing each of the services provided by the Corporation ;

*(vii)* particulars of all plans, proposed expenditures, actual expenditures on major services provided or activities performed and reports on disbursements made ;

*(viii)* details of subsidy programmes on major services provided or activities performed by the Corporation, and manner and criteria of identification of beneficiaries for such programmes ;

*(ix)* particulars of the master plan, city development plan or any other plan concerning the development of the municipal area ;

*(x)* the particulars of major works, as may be specified by notification by the State Government, in the *Official Gazette*, together with information on the value of works, time of completion and details of contract ;

*(xi)* the details of the municipal funds, i.e. income generated in the previous year by the following :—

*(a)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permissions ;

*(b)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permission that remain uncollected and the reasons thereof ;

*(c)* share of taxes levied by the State Government and transferred to the Corporation and the grants released to the Corporation ;

*(d)* grants released by the State Government for implementation of the schemes, projects and plans assigned or entrusted to the Corporation, the nature and extent of utilization ;

*(e)* money raised through donation or contribution from public or non-governmental agencies ;

*(xii)* annual budget allocated to each ward ;

*(xiii)* such other information, as may be prescribed.".

## CHAPTER III

## AMENDMENTS TO THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949

Bom. LIX of 1949.

**3.** After section 60 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the following Chapter shall be inserted, namely :— Insertion of Chapter IV-A in Bom. LIX of 1949.

### " CHAPTER IV-A

### DISCLOSURE OF SPECIFIED INFORMATION

**60A.** *(1)* The Corporation shall maintain and publish all its record duly catalogued and indexed in a manner, and form which enables the Corporation to disclose the information specified in sub-section *(3)*. Disclosure of specified information.

*(2)* The manner of disclosure of information shall include the publication of the information—

*(i)* in News papers ;

*(ii)* on Internet ;

*(iii)* on Notice boards of the Corporation at its Head Office as well as Ward Offices ;

*(iv)* by such other mode, as may be prescribed :

Provided that, the information shall be disclosed in the language in which it is available with the Corporation.

*(3)* The Corporation shall be required to disclose the following information, namely :—

*(i)* particulars of the Corporation ;

*(ii)* a statement showing the boards, councils, committees and other bodies, by whatever name called, constituted for the purpose of exercising the functions of the Corporation or rendering advise to it, whether or not the meetings of those boards, councils, committees and other bodies are open to the public or the minutes of such meetings are accessible to the public ;

*(iii)* a directory of its officers and employees ;

*(iv)* the particulars of officers who are empowered to grant concessions, permits or authorisations for any activity of the Corporation ;

*(v)* audited financial statements showing Balance sheet, Receipts and Expenditures, and cash flow on a quarterly basis, within two months of end of each quarter, and audited financial statements for the full financial year, within three months of the end of the financial year ;

*(vi)* the statement showing each of the services provided by the Corporation ;

*(vii)* particulars of all plans, proposed expenditures, actual expenditures on major services provided or activities performed and reports on disbursements made ;

*(viii)* details of subsidy programmes on major services provided or activities performed by the Corporation, and manner and criteria of identification of beneficiaries for such programmes ;

*(ix)* particulars of the master plan, city development plan or any other plan concerning the development of the municipal area ;

*(x)* the particulars of major works, as may be specified by notification by the State Government, in the *Official Gazette*, together with information on the value of works, time of completion and details of contract ;

*(xi)* the details of the municipal funds, i.e. income generated in the previous year by the following :—

*(a)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permissions ;

*(b)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permissions that remain uncollected and the reasons thereof ;

*(c)* share of taxes levied by the State Government and transferred to the Corporation and the grants released to the Corporation ;

*(d)* grants released by the State Government for implementation of the schemes, projects and plans assigned or entrusted to the Corporation, the nature and extent of utilization ;

*(e)* money raised through donation or contribution from public or non-governmental agencies ;

*(xii)* annual budget allocated to each ward ;

*(xiii)* such other information, as may be prescribed.".

## CHAPTER IV

## AMENDMENTS TO THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948

C.P. and Berar II of 1950.

**4.** After section 56 of the City of Nagpur Corporation Act, 1948, the following Chapter shall be inserted, namely :— Insertion of Chapter IV-A in C.P. and Berar II of 1950.

## " CHAPTER IV-A

## DISCLOSURE OF SPECIFIED INFORMATION

Disclosure of specified information.

**56A.** *(1)* The Corporation shall maintain and publish all its record duly catalogued and indexed in a manner, and form which enables the Corporation to disclose the information specified in sub-section *(3)*.

*(2)* The manner of disclosure of information shall include the publication of the information-

*(i)* in News papers ;

*(ii)* on Internet ;

*(iii)* on Notice boards of the Corporation at its Head Office as well as Ward Offices ;

*(iv)* by such other mode, as may be prescribed :

Provided that, the information shall be disclosed in the language in which it is available with the Corporation.

(3) The Corporation shall be required to disclose the following information, namely :—

(i) particulars of the Corporation ;

(ii) a statement showing the boards, councils, committees and other bodies, by whatever name called, constituted for the purpose of exercising the functions of the Corporation or rendering advise to it, whether or not the meetings of those boards, councils, committees and other bodies are open to the public or the minutes of such meetings are accessible to the public ;

(iii) a directory of its officers and employees ;

(iv) the particulars of officers who are empowered to grant concessions, permits or authorisations for any activity of the Corporation ;

(v) audited financial statements showing Balance sheet, Receipts and Expenditures, and cash flow on a quarterly basis, within two months of end of each quarter, and audited financial statements for the full financial year, within three months of the end of the financial year ;

(vi) the statement showing each of the services provided by the Corporation ;

(vii) particulars of all plans, proposed expenditures, actual expenditures on major services provided or activities performed and reports on disbursements made ;

(viii) details of subsidy programmes on major services provided or activities performed by the Corporation, and manner and criteria of identification of beneficiaries for such programmes ;

(ix) particulars of the master plan, city development plan or any other plan concerning the development of the municipal area ;

(x) the particulars of major works, as may be specified by notification by the State Government, in the *Official Gazette*, together with information on the value of works, time of completion and details of contract ;

(xi) the details of the municipal funds, i.e. income generated in the previous year by the following :—

(a) taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permissions ;

(b) taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permission that remain uncollected and the reasons thereof ;

(c) share of taxes levied by the State Government and transferred to the Corporation and the grants released to the Corporation ;

*(d)* grants released by the State Government for implementation of the schemes, projects and plans assigned or entrusted to the Corporation, the nature and extent of utilization ;

*(e)* money raised through donation or contribution from public or non-governmental agencies ;

*(xii)* annual budget allocated to each ward ;

*(xiii)* such other information, as may be prescribed.".

## CHAPTER V

## AMENDMENTS TO THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965

Mah. XL of 1965.

Insertion of Chapter VI-A in Mah. XL of 1965.

**5.** After section 87 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, the following Chapter shall be inserted, namely :—

### " CHAPTER VI-A

### DISCLOSURE OF SPECIFIED INFORMATION

Disclosure of specified information.

**87A.** *(1)* The Council shall maintain and publish all its record duly catalogued and indexed in a manner, and form which enables the Council to disclose the information, specified in sub-section (3).

*(2)* The manner of disclosure of information shall include the publication of the information—

*(i)* in News papers ;

*(ii)* on Internet ;

*(iii)* on Notice boards of the Council at its Head Office as well as other offices, if any ;

*(iv)* by such other mode, as may be prescribed :

Provided that, the information shall be disclosed in the language in which it is available with the Council.

*(3)* The Council shall be required to disclose the following information, namely :—

*(i)* particulars of the Council ;

*(ii)* a statement showing the boards, councils, committees and other bodies, by whatever name called, constituted for the purpose of exercising the functions of the Council or rendering advise to it, whether or not the meetings of those boards, councils, committees and other bodies are open to the public or the minutes of such meetings are accessible to the public ;

*(iii)* a directory of its officers and employees ;

*(iv)* the particulars of officers who are empowered to grant concessions, permits or authorisations for any activity of the Council ;

*(v)* audited financial statements showing Balance sheet, Receipts and Expenditures, and cash flow on a quarterly basis, within two months of end of each quarter, and audited financial statements for the full financial year, within three months of the end of the financial year ;

*(vi)* the statement showing each of the services provided by the Council ;

*(vii)* particulars of all plans, proposed expenditures, actual expenditures on major services provided or activities performed and reports on disbursements made ;

*(viii)* details of subsidy programmes on major services provided or activities performed by the Council, and manner and criteria of identification of beneficiaries for such programmes ;

*(ix)* particulars of the master plan, city development plan or any other plan concerning the development of the municipal area ;

*(x)* the particulars of major works, as may be specified by notification by the State Government, in the *Official Gazette*, together with information on the value of works, time of completion and details of contract ;

*(xi)* the details of the municipal funds, i.e. income generated in the previous year by the following :—

*(a)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permissions ;

*(b)* taxes, duties, cess and surcharge, rent from the properties, fees from licenses and permission that remain uncollected and the reasons thereof ;

*(c)* share of taxes levied by the State Government and transferred to the Council and the grants released to the Council ;

*(d)* grants released by the State Government for implementation of the schemes, projects and plans assigned or entrusted to the Council, the nature and extent of utilization ;

*(e)* money raised through donation or contribution from public or non-governmental agencies ;

*(xii)* annual budget allocated to each ward ;

*(xiii)* such other information, as may be prescribed.".

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई